DAY — **16** SEAT NUMBER | | | | | | |

2025	III	04	1500	**J-392**	(M)

FOUR WHEELER SERVICE TECHNICIAN (G3)
(REVISED COURSE)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) आवश्यक त्या ठिकाणी सुबक नामनिर्देशित आकृत्या काढाव्यात.

(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(३) सर्व प्रश्नांच्या उत्तरांचा प्रारंभ नवीन पानांवर करावा.

प्र. १. **(अ)** खालील पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) वाहनासाठी ही सेवा पुस्तिकेचा मुख्य उद्देश ..... हा आहे.

(अ) वाहनांची पुनर्विक्रीची किंमत ठरविणे

(ब) मेकॅनिकच्या मनोरंजनासाठी

(क) सेवा व दुरुस्ती करण्यासाठी

(२) ..... मेनूचा वापर डेटा क्रमवारी लावण्यासाठी करतात.

(अ) साधने

(ब) डेटा

(क) वरीलपैकी एकही नाही

(३) खालीलपैकी कोणत्या साधनांचा वापर इंजिनमध्ये हवा व गॅस यांचा वेळेवर व गुणवत्तापूर्वक पुरवठा करण्यासाठी करतात?

(अ) पिस्टन रिंग

(ब) रॉकर ऑर्म

(क) व्हॉल्व्ह

(४) ..... प्रोपेलर शाफ्टचा उपयोग होतो.

(अ) इंजिन स्वच्छ करण्यासाठी

(ब) गिअर बॉक्सपासून डिफरनशिअलकडे ताकद पाठविण्यासाठी

(क) सस्पेंशनवर नियंत्रण मिळवण्यासाठी

(५) वाहनांची ..... पासून ठराविक उंची राखणे हे सस्पेंशन सिस्टिमचे एक मुख्य कार्य आहे.

(अ) रोड

(ब) पृष्ठभाग

(क) अ व ब दोन्ही

(ब) खालील 'अ' व 'ब' गटांतील शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) प्रोपेलर शाफ्ट	(१) अर्थिंग
(ब) सेवा पुस्तिका	(२) दुरुस्ती रेकॉर्ड
(क) लीफ स्प्रिंग	(३) जास्त वजन
(ड) सस्पेंशन सिस्टिम	(४) शक्तीचा पुरवठा करण्यासाठी
(इ) ब्लॅक वायर	(५) हादरे शोषण्यासाठी

(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा : (५)

(१) हिरव्या केबलचा वापर हेडलॅम्प सर्किटसाठी केला जातो.

(२) सोलर ऊर्जा एक स्वच्छ ऊर्जास्रोत आहे.

(३) MPFI सिस्टिम ही इंजिनची कार्यक्षमता वाढविण्याचे काम करते.

(४) ट्रान्समिशन सिस्टिमचा वापर हादरे शोषण्यासाठी केला जातो.

(५) बॅटरी हे ऑटोमोटिव्ह इलेक्ट्रिक सिस्टिमचे बॅटरी हे हृदय आहे.

(ड) खालील प्रश्नांची प्रत्येकी फक्त 'एका' वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) प्रोपेलर शाफ्टचा उपयोग लिहा.

(२) संघटनात्मक कौशल्य म्हणजे काय?

(३) व्हॉल्व्ह मॅकनिझमचा उपयोग लिहा.

(४) सेवा पुस्तिका म्हणजे काय?

(५) ऑटोमोटिव्ह इलेक्ट्रिक संकेत चिन्ह वापरण्याचे उद्देश लिहा.

प्र. २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) सक्रिय श्रवणाचे पाच टप्पे लिहा.

(२) कूलिंग सिस्टिममधील कोणतेही सहा दोष आणि त्यावरील उपाय लिहा.

(३) ग्रीन जॉबचे फायदे लिहा.

(४) लीफ स्प्रिंगबद्दल माहिती लिहा.

(५) यशस्वी उद्योजकांची वैशिष्ट्ये लिहा.

(६) ऑसिलोस्कोप (oscilloscope) बद्दल माहिती लिहा.

प्र. ३. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) ताण म्हणजे काय व तो तुम्ही कशाप्रकारे हाताळाल याबद्दल माहिती लिहा.

(२) कूलिंग सिस्टिमध्ये निर्माण होणारे साधारण दोष कोणते ते लिहा.

(३) प्रोपेलर शाफ्टबद्दल सविस्तर माहिती लिहा.

(४) बॅटरी हाताळताना करायचे साधारण खबरदारीचे उपाय कोणते ते लिहा.

(५) स्प्रेडशीटची वैशिष्ट्ये लिहा.

(६) वाहनांमधील लाईट सिस्टिममध्ये इलेक्ट्रिकल कनेक्शन चेक करणे का गरजेचे आहे ते लिहा.

प्र. ४. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) संभाषण कौशल्य म्हणजे काय आणि संभाषणाची मुख्य कौशल्ये लिहा.

(२) पिस्टन रिंगचे मुख्य फायदे लिहा.

(३) टीप लिहा – मल्टीमीटर

(४) व्हॉल्व्ह रीकंडीशनिंगच्या पायऱ्या लिहा.

(५) वैयक्तिक कौशल्यांबद्दल माहिती लिहा.

प्र. ५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) उद्योजकांच्या प्रकारांची यादी करा.

(२) बॅटरी तपासण्याच्या पायऱ्या लिहा.

(३) सेवा पुस्तिकेचे फायदे लिहा.

(४) डिफरेंशियलचे (differential) महत्त्व व त्याचे कार्य लिहा.

(५) फ्यूजचा उपयोग लिहा आणि त्याचे प्रकार स्पष्ट करा.

प्र. ६. (अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही एक) : (६) **[१२]**

(१) सस्पेंशन सिस्टिमचे महत्त्व व त्याचे फायदे लिहा

(२) MPFI सिस्टिमची माहिती लिहून त्याचे फायदे लिहा.

(ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही एक) : (६)

(१) टर्बो चार्जरचा उपयोग सांगून टर्बो चार्जरच्या सर्व्हिसिंगबद्दल माहिती लिहा.

(२) वाहनामध्ये इलेक्ट्रिक सर्किटमध्ये कोणत्या केबल्स वापरतात, सविस्तर लिहा.

◆◆◆